THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 28TH MARCH 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादूर यांनीं तारीख ४ माहे जानेवारी सन १८९५ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—**

# सन १८९५ चा आक्ट नंबर १ ला.

**सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टांसंबंधी आक्ट सुधारण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थी सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टांसंबंधीं आक्ट सुधारणें योग्य आहे ; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९९ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टांसंबंधी आक्ट असें ह्मणावें ; आणि सरनामा व सुरवात.

(२) तो सन १८९९ च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

२. सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉल कॉज कोर्टांसंबंधी आक्ट कीं ज्यास यांत पुढें "सदहू आक्ट" असें ह्मटलें आहे त्याच्या ६ व्या कलमांत "देखरेखीखालीं आहे असें" या शब्दांनंतर खालील शब्द जास्त दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :— सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ६ व्या कलमाची सुधारणूक.

"व सन १८७९ च्या लीगल प्राक्टिशनरांच्या आक्टाच्या ६ व्या कलमाच्या उद्देशाप्रमाणें हाय् कोर्टाच्या ताब्यांतील कोर्ट आहे असें".

३. (१) सदहू आक्टाच्या ७ व्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील "मात्र याप्रमाणें" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या विशेष ठरावाच्या बदला खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :— सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ७ व्या कलमाची सुधारणूक.

"मात्र कोणत्याहि मनुष्यास अशा कोर्टाचा जज्ज ह्मणून नेमणें तो किंवा अशा कोर्टाच्या जज्जाचे अधिकार चालविण्याचा अख्त्यार देणें तो, तो मनुष्य.—

(अ) सन १८६१ च्या हिंदुस्थानच्या हाय् कोर्टाविषयींच्या आक्टाअन्वयें स्थापन झालेल्या एकाद्या न्यायाधिकारी हाय् कोर्टाचा आडवोकेट, किंवा

(ब) अशा कोणत्याहि हाय् कोर्टाचा वकील किंवा अटर्नी, किंवा

(क) पांच वर्षांहून कमी नाहीं अशा मुदतीपर्यंत एकाद्या दिवाणी न्यायाधिकारी कोर्टाचा जज्ज,

नसेल तर त्यास नेमूं नये किंवा देऊं नये :

आणि याप्रमाणें नेमलेल्या मनुष्यांपैकीं, चीफ जज्ज धरून, निदान एक तृतीयांश मनुष्य सदर्हू हाय् कोर्टांपैकीं कोणत्याहि एका हाय् कोर्टाचे आडवोकेट असले पाहिजेत".

(२) सदर्हू आक्टाच्या ७ व्या कलमाचा शेवटचा पारिग्राफ या कलमावरून रद्द केला आहे.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ८ व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

४. सदर्हू आक्टाच्या ८ व्या कलमानंतर खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

गैरहजर असलेल्या जज्जाचीं कामें करणें.

" ८ अ. चीफ् जज्जाच्या कोणत्याहि प्रकारच्या गैरहजिरींत त्या कोर्टाच्या जज्जांपैकीं जो कोणताहि जज्ज चीफ् जज्जाच्या जागेस लायक असेल त्यास चीफ् जज्जाचीं कामें करण्यासाठीं नेमण्यास, व योग्य रीतीनें लायक असलेल्या कोणत्या तरी इतर मनुष्यास, चीफ् जज्ज अशा गैरहजिरीवरून परत येईपर्यंत, सदर्हू कोर्टाचा जज्ज ह्मणून काम करण्यासाठीं नेमण्यास स्थानिक सरकार मुखत्यार आहे ; आणि सदर्हू कोर्टाच्या एखाद्या जज्जाच्या कोणत्याहि प्रकारच्या गैरहजिरींत योग्य रीतीनें लायक असलेल्या एकाद्या मनुष्यास सदर्हू कोर्टाचा जज्ज ह्मणून काम करण्यासाठीं नेमण्यास सदर्हू स्थानिक सरकार मुखत्यार आहे, व याप्रमाणें नेमलेल्या प्रत्येक मनुष्यास, गैरहजर असलेला जज्ज परत येईपर्यंत किंवा स्थानिक सरकारास अशा आक्टिंग जज्जाची नेमणूक रद्द करण्यास कारण दिसून येई तोंपर्यंत, सदर्हू कोर्टाच्या जज्जाचीं कामें करण्याचा अधिकार दिला पाहिजे. "

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ९ व्या कलमाबदल नवीन कलम दाखल करणें व विद्यमान काम चालविण्याची रीति व रिवाज कांहीं मुदतीपर्यंत चालू ठेवणें.

९. सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाच्या बदला खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

स्मॉल कॉज कोर्टाची काम चालविण्याची रीति व त्याचा रिवाज.

"९. (१) हाय् कोर्ट वेळोवेळीं, कायद्यासारखा ज्यांचा अमल असेल अशा कानू करून,

(अ) स्मॉल कॉज कोर्टाच्या काम चालविण्याच्या रीतीच्या संबंधानें किंवा त्याच्या रिवाजाच्या संबंधानें जे कोणतेहि ठराव सन १८९४ च्या डिसेंबर महिन्याच्या एकतिसाव्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वीं हा आक्ट किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेला कोणताहि इतर कायदा यांत अगर याअन्वयें केलेले असतील ते ठराव रद्द करून किंवा त्यांशिवाय आणखी, स्मॉल कॉज कोर्टानें कोणत्या रीतीनें काम चालवावें व त्या कोर्टाचा रिवाज कसा असावा याबाबद ठराव करण्यास, आणि

(ब) अशी कोणतीहि कानू अगर अशा कोणत्याहि कानू रद्द करण्यास किंवा त्यांत फेरफार करण्यास,

मुखत्यार आहे.

"या कलमाअन्वयें करावयाच्या कानूंमध्यें, दुसऱ्या बाबतींबरोबर, या आक्टावरून किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्यावरून स्मॉल कॉज

कोर्टास दिलेले कोणतेहि अधिकार स्मॉल कॉज कोर्टाच्या एका जज्जानें चालवावयाचे किंवा अधिक जज्जांनीं चालवावयाचे यावदलहि ठराव करण्याचा अख्त्यार आहे.

"(२) स्मॉल कॉज कोर्टानें काम चालविण्याच्या रीतीसंबंधी किंवा रिवाजासंबंधी जो कायदा आणि त्याअन्वयें केलेल्या अगर केल्या असें झटलेल्या कोणत्याहि कानू व ठराव अशा कोर्टांत सन १८९४ च्या डिसेंबर महिन्याच्या एकतिसाव्या तारखेरोजीं अमलांत असतील किंवा अमलांत असल्याप्रमाणें मानले असतील तो कायदा व त्या कानू व ठराव हीं, या कलमाअन्वयें हाय् कोर्टानें केलेल्या कानूंवरून रद्द केलीं नाहींत किंवा फिरविलीं नाहींत तर व रद्द केलीं किंवा फिरविलीं जात तोंपर्यंत, अमलांत राहतील."

६. सदर्हू आक्टाच्या १४ व्या कलमांत खालीं लिहिलेला मजकूर ज्यास्त वाढवावा, ह्मणजे:—

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या १४ व्या कलमांत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

"खुलासा.—या कलमाच्या कारणांसाठीं, ४१ व्या कलमाअन्वयें कवजा मिळण्याविषयीं केलेला अर्ज दावा होय असें मानलें पाहिजे."

७. सदर्हू आक्टाच्या १८ व्या कलमांत पहिल्या खुलाशाच्यापूर्वी खालीं लिहिलेला विशेष ठराव ज्यास्त दाखल करावा, ह्मणजे:—

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या १८ व्या कलमांत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

"मात्र इतकेंच कीं फिर्यादीचें कारण सर्वस्वी वर सांगितल्या प्रकारच्या स्थानिक मर्यादेच्या आंत उपस्थित झालें असून दावा दाखल करण्याची परवानगी देण्यास कोर्ट इनकार करील तेव्हां त्याप्रमाणें इनकार करण्याचीं कारणें कोर्टानें लिहून ठेविलीं पाहिजेत."

८. सदर्हू आक्टाच्या १८ व्या कलमानंतर खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:—

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या १८ व्या कलमांत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

हुकुमतीच्या बाहेर राहणाऱ्या प्रतिवादीच्या संबंधाचा दावा सोडून देण्याचा वादीस अधिकार आहे.

"१८ अ. फिर्यादीचें कारण सर्वस्वी किंवा अंशतः स्मॉल कॉज कोर्टाच्या हुकुमतीच्या स्थानिक मर्यादेच्या आंत उपस्थित झालें असून त्या फिर्यादीच्या कारणावरून ज्या दाव्यांत सामायिक व निरनिराळी जबाबदारी आहे असें ह्मणणें असेल त्या दाव्याच्या पहिल्या चौकशीच्या वेळीं किंवा त्यापूर्वी वादीला, जो कोणताहि प्रतिवादी अशा स्थानिक मर्यादेच्या आंत रहात नसेल किंवा धंदा चालवीत नसेल किंवा अर्जनासाठीं जातीनें श्रम करीत नसेल त्याच्या संबंधाचा दावा सोडून देण्याची व जे प्रतिवादी सदर्हूप्रमाणें राहत असतील, धंदा चालवीत असतील किंवा अर्जनासाठीं जातीनें श्रम करीत असतील त्यांजवरच मात्र हुकुमनामा मिळण्याविषयीं दावा करण्याची परवानगी देण्यास स्मॉल कॉज कोर्ट मुखत्यार आहे."

९. सदर्हू आक्टाच्या १९ व्या कलमांत खालीं दिलेला मजकूर ज्यास्त दाखल करावा, ह्मणजे:—

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या १९ व्या कलमांत ज्यास्त मजकूर दाखल करणें.

फिर्यादअर्जी परत करणें.

"१९ अ. जेव्हां दाव्यांतील मुद्याच्या प्रश्नाचा अखेर निकाल आपणास हुकुमत नसल्यामुळें करतां येत नाहीं असें कोर्टास आढळून येईल तेव्हां त्या कोर्टास, चालविलेलें काम चालत असतां कोणत्याहि वेळीं, फिर्यादअर्जी, त्या प्रश्नाचा निकाल करण्याची हुकुमत असणाऱ्या एखाद्या कोर्टांत रुजू करण्यासाठीं परत करण्याचा अधिकार आहे. तें कोर्ट याप्रमाणें फिर्यादअर्जी परत करील तेव्हां त्या कोर्टानें सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ५७ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांतील ठरावांस अनुसरून वहिवाट केली पाहिजे व आपणास योग्य वाटेल तसा खर्चाबावद हुकुम केला पाहिजे आणि तें कोर्ट, सन १८७७ चा हिंदुस्थानचा मुदतीविषयींचा आक्ट याच्या कारणांसाठीं, हुकुमतींत व्यंग असल्याच्या कारणानें तो दावा घेण्यास असमर्थ आहे असें समजलें पाहिजे. जेव्हां याप्रमाणें परत केलेली फिर्यादअर्जी पुढें हाय् कोर्टांत रुजू करण्यांत येईल तेव्हां, हाय् कोर्टाच्या रिवाजाप्रमाणें ज्या कोणत्याहि फी सरकारच्या खातीं जमा करण्यांत येतात त्या वसूल

करतांना त्या फिर्यादअर्जीच्या संबंधानें जी कोर्टफीची रकम स्मॉल कॉज कोर्टांत दिलेली असेल ती वादीस मजुरा दिली पाहिजे.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या २१ व्या कलमाची सुधारणूक.

१०. सदहू आक्टाच्या २१व्या कलमांत, "असे सर्व दावे" या शब्दांनंतर "व ज्यांच्या विषयाचा ऐवज किंवा किंमत एक हजार रुपयांहून अधिक असेल असे सर्व दावे," हे शब्द दाखल करावे.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या २२ व्या कलमाची सुधारणूक.

११. सदहू आक्टाच्या २२ व्या कलमांत, "दोन हजार रुपयांहून" या शब्दांबदल "एक हजार रुपयांहून" हे शब्द दाखल करावे.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाचें २३ वें कलम व दुसरें परिशिष्ट रद्द करणें.

१२. सदहू आक्टाचें २३ वें कलम व दुसरें परिशिष्ट हीं यावरून रद्द केलीं आहेत.

सन १८८२ च्या १५ व्या आक्टाच्या ६ व्या बाबीच्या ऐवजीं नवीन बाब दाखल करणें.

१३. सदहू आक्टाच्या ६ व्या बाबीच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

---

## बाब ६.

### "नवीन इन्साफ व अपिलें.

स्मॉल कॉज कोर्टाचे हुकमनामे व हुकुम सामान्यतः अखेरचे असणें.

"३७. या बाबीवरून किंवा विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि दुसऱ्या कायद्यावरून इतर रीतीनें ठरविलें असेल तो प्रसंग खेरीज करून बाकी प्रसंगीं स्मॉल कॉज कोर्टानें एकाद्या दाव्यांत केलेला प्रत्येक हुकुमनामा व हुकुम अखेरचा व कायमचा असेल असें समजावें.

तकरारीच्या खटल्याचा नवीन इन्साफ.

"३८. एकाद्या दाव्याविषयीं तकरार असेल तेव्हां, त्या दाव्यांत (सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ५२२ व्या कलमाअन्वयें केलेला हुकुमनामा नव्हे असा) हुकुमनामा किंवा हुकुम झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत दोघांतून कोणत्याहि एका पक्षकारानें अर्ज केला असतां स्मॉल कॉज कोर्टाला, आपणास वाजवी वाटतील त्या शर्तींवर, नवीन इन्साफ करण्याविषयीं हुकुम करण्याचा, किंवा असा हुकुमनामा अगर हुकुम बदलण्याचा, रद्द करण्याचा किंवा फिरविण्याचा अधिकार आहे, आणि तें कोर्ट दरमियान पुढें काम चालविण्याचें तहकूब ठेवण्यास मुखत्यार आहे.

**खुलासा.**—ज्या दाव्यांत हुकुमनामा प्रतिवादीच्या संमतीशिवाय, किंवा प्रतिवादीनें हजर होण्यास कसूर केली असेल अशा प्रसंगाशिवाय केला असेल तो प्रत्येक दावा तकरारीचा दावा आहे असें मानलें पाहिजे.

कित्येक दाव्यांचा हाय कोर्टांत वर्ग करणें.

"३९. (१) ज्या दाव्यांत विषयाचा ऐवज किंवा किंमत एक हजार रुपयांच्या रकमेहून अधिक असेल अशा, स्मॉल कॉज कोर्टांत केलेल्या, कोणत्याहि दाव्यांत, प्रतिवादीस, किंवा प्रतिवादींपैकीं कोणत्याहि एका प्रतिवादीस, प्रतिवादीनें हजर होण्यासाठीं समन्सावरून ठरविलेल्या दिवसाच्या पूर्वीं, किंवा त्यावर समन्स बजाविल्यानंतर आठ दिवसांच्या आंत, या दोहोंतून जी कोणतीहि मुदत शेवटीं संपेल त्या मुदतींत, तो आपल्या बचावासाठीं ज्या हकीकतीवर विश्वास ठेवीत असेल ती हकीकत लिहून आफिडेव्हिट करून, त्या दाव्याचा हाय् कोर्टांत वर्ग करण्याविषयीं हुकुम व्हावा ह्मणून हाय् कोर्टाच्या एकाद्या जज्जास एकतर्फी अर्ज करण्याचा अधिकार आहे.

"(२) सदहू अर्ज केवळ विलंब करण्याच्याच कारणासाठीं केलेला आहे असें जज्जाचें मत नसेल तर असा हुकुम अर्जदाराला हक्कानें मिळाला पाहिजे, परंतु जज्जास योग्य वाटल्यास, सदहू दाव्याच्या संबंधानें वादीस जो कोणताहि खर्च अर्जदारानें भरून द्यावा लागेल त्या खर्चाच्या भरपाईसाठीं अशा हुकुमनाम्यांत निर्दिष्ट करावयाच्या वाजवी रकमेचें तारण देण्याविषयीं त्या हुकुमांत व त्या हुकुमावरून फर्माविण्याचा त्या

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालील आक्ट भालीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख १ माहे मार्च सन १८९५ रोजीं मंजूर केला ; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९५ चा आक्ट ७ वा.

**दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचीं आणि सन १८७२ चा पंजाबच्या कायद्यांसंबंधी आक्ट यांचीं कांहीं कलमें सुधारण्याबाबदचा आक्ट.**

ज्याअर्थीं दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचीं आणि सन १८७२ चा पंजाबच्या कायद्यांसंबंधी आक्ट याचीं कांहीं कलमें सुधारणें इष्ट आहे, त्याअर्थीं यावरून पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

**दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा.**

सन १८८२ चा आक्ट १४ वा याच्या ३९ व्या कलमाची सुधारणा.

१. (१) सदरहू कायद्याच्या ३९ व्या कलमाच्या तिसऱ्या पारिग्राफांत, "बादशाही सनदेवरून स्थापिलेल्या कोणत्याही हे कोर्टाच्या" या शब्दांच्या व "ऑडव्होकेटास" या शब्दांच्या दर्म्यान "किंवा पंजाबच्या चीफ कोर्टाच्या" हे शब्द दाखल करावे.

(२) सदरहू कलमांत खालील खुलासा जास्त दाखल करावा : तो येणेंप्रमाणें:—

"खुलासाः—आडव्होकेटांचीं नांवें दाखल करण्याच्या कारणांसाठीं, मुंबई हे कोर्टास, सिंधचें सदर कोर्ट आपल्या हुकुमतीच्या स्थानिक हद्दीच्या आंत आहे असें गणण्याचा अधिकार आहे."

सन १८८२ चा आक्ट १४ वा याच्या १८० व्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू कायद्याचें कलम १८० याच्या पहिल्या व दुसऱ्या पारिग्राफांच्या बदल खालील मजकूर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

"नंतर दुसऱ्या पक्षकारानें आपला मुकदमा कळविला पाहिजे आणि आपला पुरावा (असल्यास) हजीर केला पाहिजे, आणि मग त्यास एकंदरींत दरोबस्त मुकदम्याविषयीं कोर्टापुढें भाषण करण्याचा अधिकार आहे.

"त्यानंतर, आरंभ करणाऱ्या पक्षकारास, एकंदरींत दरोबस्त मुकदम्याविषयीं प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आहे."

**सन १८७२ चा पंजाबच्या कायद्यांसंबंधी आक्ट.**

३ व ४. [हीं कलमें मुंबई इलाक्यास लागू नसल्याकारणानें त्यांचा तरजुमा केला नाहीं].

(सही) जे. एम्. म्याकफर्सन्,

आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

जज्जास अधिकार आहे, आणि तसेंच अशा जज्जास योग्य वाटल्यास तो जज्ज सदर्हू दाव्याचा वर्ग करणें हें, सदर्हू हुकुमांत निर्दिष्ट करावयाच्या वाजवी वेळेच्या आंत असें तारण पुरें करण्यावर अवलंबून राहील, असेंहि त्या हुकुमांत फर्माविण्यास मुखत्यार आहे.

"(३) सदर्हूप्रमाणें कोणतेंहि तारण देण्याविषयीं फर्माविलें असल्यास तें, कोणतीहि वेळ निर्दिष्ट केली असल्यास त्या वेळेच्या आंत, पुरें करण्यास अर्जदार चुकेल किंवा हयगय करील तर सदर्हू हुकुम रद्द केला पाहिजे, आणि असा हुकुम केलाच नव्हता असें समजून तो दावा स्मॉल कॉज कोर्टांत चालला पाहिजे.

"(४) या कलमाअन्वयें हाय् कोर्टांत वर्ग केलेल्या कोणत्याहि खटल्यांत वादी, स्मॉल कॉज कोर्टाच्या हुकमतीच्या आंत सदर्हू दावा आणतां यावा ह्मणून आपल्या मागणीचा कांहीं भाग सोडून देईल तर, त्यास त्याच्या मागणीच्या याप्रमाणें सोडून दिलेल्या भागाचें पुनरुज्जीवन करण्यास परवानगी दिली पाहिजे.

सदरील शेवटल्या कलमाअन्वयें वर्ग केलेल्या दाव्यांच्या संबंधानें नियम.

"४०. (१) एकाद्या दाव्याचा सदरील शेवटल्या कलमाअन्वयें हाय् कोर्टांत वर्ग केला असेल तेव्हां त्या कोर्टानें आपली अवल हुकुमत चालवून त्या दाव्याची चौकशी करून निकाल केला पाहिजे, आणि तो दावा पहिल्यानेंच अशा कोर्टांत केला असता तर त्या कोर्टास त्या दाव्याच्या संबंधानें जे अधिकार व जी हुकुमत असती तेंच सर्व अधिकार व तीच सर्व हुकुमत त्याच्या संबंधानें त्या कोर्टास आहे असें समजावें.

"(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें वर्ग केलेल्या प्रत्येक दाव्यांत, कलम ३९, पोटकलम (१), याअन्वयें केलेलें आफिडेव्हिट हें, कोर्ट इतर रीतीनें हुकुम करणार नाहीं तर, प्रतिवादीनें सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या ११० व्या कलमाअन्वयें दिलेली लेखी कैफीयत आहे असें मानलें पाहिजे.

"(३) सदरीं सांगितल्याप्रमाणें वर्ग केलेल्या प्रत्येक दाव्यांत, हाय् कोर्टाच्या रिवाजाप्रमाणें ज्या कोणत्याहि फी सरकारास द्यावयाच्या असतील त्या वसूल करतांना, फिर्यादअर्जीच्या संबंधानें स्मॉल कॉज कोर्टांत दिलेली कोर्टफीची रकम वादीस मजुरा दिली पाहिजे."

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.